**वाचले :-** १) शासन, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.साविव्य-१००६/प्र.क्र.२४४९/ना.पु.२८, दि.१६ सप्टेंबर, २००६.
२) इकडील आदेश क्र.पसह/कावि/१९९०/२०१०, दि. १४/१२/२०१०
३) इकडील सुधारीत आदेश क्रं. सशा/पसह/कावि/२२७०/२०११ दि.१५/१२/२०११.
४) मा. पालकमंत्री यांचेकडील पत्र क्रं. जा.क्रं.पालकमंत्री/अन्न व ना.पु. आणि ग्रा.सं.अ.औ.प्र.व सं.कार्य /व्ही.आय.पी./१३१९ दिनांक- १७/०८/२०१५.

---

जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे
सर्वसाधारण शाखा,पसह संकलन
क्र.सशा/पसह/कावि/१८०८/२०१५
दि. १४/०९/२०१५

**विषय :- जिल्हा भाववाढ संनियंत्रण समिती**

**सुधारीत आदेश**

उक्त नमुद शासन निर्णयानुसार व आदेशानुसार सदर समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीती अशासकिय सदस्यांच्या नियुक्तीबाबत मा. पालकमंत्री पुणे जिल्हा यांचेकडून शिफारस प्राप्त झालेने सदरचे अशासकिय सदस्यांचा समावेश करुन खालीलप्रमाणे सुधारीत आदेश निर्गमित करणेत येत आहे.

| अ.क्र. | समितीची रचना व नावे | पत्ता | पद |
|---|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी | जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे | अध्यक्ष |
| २ | पोलिस अधिक्षक, पुणे ग्रामीण | जिल्हा पोलीस अधिक्षक, चव्हाणनगर, पाषाण, पुणे | सदस्य |
| ३ | अतिरिक्त जिल्हाधिकारी | जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे | सदस्य |
| ४ | **अन्नधान्य, भाजीपाला इत्यादी जीवनावश्यक वस्तुंच्या व्यापारी संघटनेचे जिल्हास्तरीय तीन प्रतिनीधी (जिल्हाधिकारी नामनिर्देशित)** | | |
| | १) श्री. मदनलाल कन्हैयालाल डांगी | ६८६ सिध्दिविनायक टॉवर, बिबवेवाडी, पुणे मो. नं. ९४२२०७८८११ | सदस्य |
| | २) श्री. ज्ञानदेव मल्हारी मारकड | मदनवाडी, ता. इंदापूर, जि. पुणे | सदस्य |
| | ३) रविंद्र बाळासाहेब करंजखेले | मु. पो. धामणी, ता. आंबेगाव, जि. पुणे मो. नं. ९९२२११०८८८. | सदस्य |
| ५ | भारतीय अन्न महामंडळाचे एरिया मॅनेजर | भारतीय खादय निगम, पुणे ९४/१०२ कोरेगाव पार्क, साऊथ मेन रोड, पुणे ४११ ००१. | सदस्य |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | जिल्हा समन्वयक तेल उद्योग | क्षेत्रीय प्रबंधक, पुणे क्षेत्रीय कार्यालय, हिंदुस्थान पेट्रोलियम, नेहरु मेमोरीयल हॉल शेजारी, कॅम्प, पुणे ४११ ००१. | सदस्य |
| ७ | उपनिबंधक, ( जिल्हा सहकारी संस्था) पुणे | जिल्हा उपनिबंधक (सहकारी संस्था) पुणे साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे | सदस्य |
| ८ | जिल्हा पुरवठा अधिकारी | जिल्हा पुरवठा कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे | सदस्य सचिव |

**(सौरभ राव)**
**जिल्हाधिकारी पुणे**

प्रत :- १) जिल्हा पुरवठा अधिकारी, पुणे तथा सदस्य सचिव,
२/- उपरोक्त समितीचे सदस्य सचिव म्हणून आपली नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदरची समिती वरील आदेशान्वये गठित करण्यात आलेली असल्याने, सदर बैठक सत्वर बोलावून समितीचे कामकाज कार्यान्वित करण्यात यावे. तसेच सोबतच्या आदेशाच्या प्रति संबंधित सदस्यांना बजावून त्यांची दिनांकित स्वाक्षरी घेणेत यावी.

२) स्वीय सहाय्यक, मा. पालकमंत्री, अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण अन्न व औषध प्रशासन, संसदीय कार्य, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई ३२.
२/- सदर समिती या आदेशान्वये गठीत केलीबाबत मा. मंत्री महोदय यांचे निदर्शनास आणून देणेस विनंती आहे.

३) मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग पुणे यांस माहितीस्तव सविनय सादर.

**जिल्हाधिकारी पुणे करीता**

Renew Samittes

२४०

जिल्हास्तरीय भाववाढ संनियंत्रण
समिती स्थापन करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक : साविव्य-१००६/प्र.क्र.२४४१/ना.पु.२८
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १६ सप्टेंबर,२००६

प्रस्तावना :- मागील काही कालावधीपासून राज्यातील जीवनावश्यक वस्तूंच्या किंमतीमध्ये भाववाढ झाली असून विशेषत: अन्नधान्य व भाजीपाला यांच्या भावांमध्ये भरीव वाढ झाल्याच्या बातम्या विविध वृत्तपत्रांत प्रसिध्द झाल्या आहेत. भाववाढ होण्याची कारणे व ती रोखण्यासाठी करावयाची उपाययोजना याबाबत, मा.प्रधानमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली, देशातील राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची एक बैठक, दिनांक ५ जुलै,२००६ रोजी नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये वाढत्या भाववाढीवर नियंत्रण ठेवणे गरजेचे असून अशाप्रकारे नियंत्रण ठेवण्यासाठी संबंधित व्यापाऱ्यांमार्फत जीवनावश्यक वस्तूंच्या करण्यात येणा-या साठ्यांवर राज्य शासनाचे नियंत्रण असणे आवश्यक असल्याची बाब केंद्र शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आली. त्या अनुषंगाने गहू व डाळींवर [Wheat and Pulses (Whole or Split)] साठा नियंत्रण लागु करण्याबाबत केंद्र शासनाने दिनांक २९ ऑगस्ट, २००६ रोजी अधिसूचना निर्गमित केली आहे. ही बाब तसेच, भाववाढ नियंत्रणाबाबत करावयाची कार्यवाही व त्यावरील प्रभावी संनियंत्रणासाठी जिल्हास्तरीय भाववाढ संनियंत्रण समिती स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :- प्रस्तावनेत नमूद केलेली पार्श्वभूमी लक्षात घेऊन जीवनावश्यक वस्तूंच्या भाववाढीवर नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हास्तरीय भाववाढ संनियंत्रण समिती स्थापन करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

सदर जिल्हास्तरीय भाववाढ संनियंत्रण समितीची रचना पुढील प्रमाणे राहील :-

| | | |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २ | जिल्हा पोलीस अधीक्षक | सदस्य |
| ३ | अतिरिक्त जिल्हाधिकारी | सदस्य |
| ४ | अन्नधान्य, भाजीपाला इत्यादी जीवनावश्यक वस्तूंच्या व्यापारी संघटनेचे जिल्हास्तरीय तीन प्रतिनिधी (जिल्हाधिकारी नामनिर्देशित) | सदस्य - ३ |
| ५ | भारतीय अन्न महामंडळाचे एरिया मॅनेजर | सदस्य |
| ६ | जिल्हा व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र | सदस्य |
| ७ | जिल्हा उपनिबंधक (सहकारी संस्था) | सदस्य |
| ८ | जिल्हा पुरवठा अधिकारी | सदस्य सचिव |

3924

जिल्हाधिकारी, पुणे
कार्यालय 800 संकलन

पृ...2

२. उपरोक्त समितीची कार्यकक्षा खालील प्रमाणे असेल :-

(अ) स्तरीय संनियंत्रण समिती भाववाढीसंदर्भात आवश्यकतेनुसार, व्यापारी संघटनांच्या बैठका घेणे, भाववाढीबाबत व अनुषंगिक अन्नधान्याची साठवणूक न करण्याबाबत व्यापारी वर्गास आवाहन करणे आणि साठेबाजीस आळा बसावा म्हणून संबंधित अधिकाऱ्यांना साठेबाजांवर धाडी टाकण्याच्या सूचना देणे बाबींवर निर्णय घेणे,

(ब) सामान्य जनतेस जीवनावश्यक वस्तूंची उपलब्धता व्हावी व जीवनावश्यक वस्तूंचे दर नियंत्रणात रहावेत यासाठी विचारविनिमय करणे,

(क) विविध यंत्रणेकडून भाववाढीबाबत सूचविण्यात आलेल्या उपाययोजना / सूचना व इतर बाबींच्या संदर्भात शिफारशी करणे,

(ड) जिल्हास्तरीय संनियंत्रण समितीची बैठक प्रत्येक महिन्याला घेऊन भाववाढीबाबत आढावा घेणे.

३. जिल्हास्तरीय भाववाढ संनियंत्रण समितीची स्थापना संबंधित जिल्हाधिकारी यांनी पुढील १५ दिवसात करण्याचे निदेश देण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(ना. ल. तडोसे)
उप सचिव,
अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

प्रति,

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
२. उपमुख्यमंत्री यांचे सचिव
३. मा. मंत्री (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण) यांचे खाजगी सचिव
४. मा. राज्य मंत्री (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण) यांचे खाजगी सचिव
५. सर्व मंत्री / राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव
६. सर्व विधान परिषद / विधानसभा सदस्य
७. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८. सर्व विभागीय आयुक्त
९. सर्व जिल्हाधिकारी
१०. सर्व जिल्हा पोलीस अधिक्षक
११. सर्व अतिरिक्त जिल्हाधिकारी / जिल्हा पुरवठा अधिकारी
१२. अन्नधान्य, भाजीपाला इत्यादी जीवनावश्यक वस्तूंच्या व्यापारी संघटनांचे राज्यस्तरीय [illegible]

१३. भारतीय अन्न महामंडळाचे एरिया मॅनेजर ( जिल्हाधिकारी यांचे मार्फत)

१४. जिल्हा समन्वयक, तेल उद्योग ( जिल्हाधिकारी यांचे मार्फत) HPCL

१५. सर्व जिल्हा उपनिबंधक (सहकारी संस्था)

१६. सर्व उपायुक्त (पुरवठा), [illegible]

१७. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई-३२. (२ प्रती)

१८. सर्व उप सचिव / अवर सचिव /कार्यासन अधिकारी, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग व अधिपत्याखालील सर्व कार्यालये

१९. सर्व मंत्रालयीन प्रशासनिक विभाग

२०. निवड नस्ती (ना.पु.२८)